जळगाव (प्रतिनिधी) दि. १० ऑक्टोबर : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या प्रतिष्ठित 'युवारंग २०२५' युवा महोत्सवांतर्गत, 'केसीआयआयएल' इन्क्युबेशन सेंटरमार्फत आयोजित केलेल्या 'युवास्पार्क २०२५' या नाविन्यपूर्ण स्टार्टअप कल्पना स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

या स्पर्धेत ५० हून अधिक नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर झाले, ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्साह आणि निकोप स्पर्धेचे वातावरण निर्माण झाले. विद्यार्थ्यांमधील उद्योजकीय गुणांना वाव देणे आणि त्यांच्या नवनवीन कल्पनांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश होता. या स्पर्धेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी कुलगुरु व केसीआयआयएलचे अध्यक्ष प्रा. विजय एल. महेश्वरी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले, तसेच संचालक मंडळाच्या सदस्यांनीही अमूल्य सहकार्य दिले.

विविध प्रकल्पांचे मूल्यांकन करण्यासाठी विशेष ज्युरी पॅनेलची नियुक्ती करण्यात आली होती. यामध्ये डॉ. राजेश जवळेकर, अजिंक्य तोतला, निखिल जाधव, रोहन मंत्री, कल्याण दानी व डॉ. नवीन खंडारे या तज्ञ परीक्षकांनी आपल्या अनुभवातून सहभागींच्या प्रकल्पांना दिशा दाखवली व विजेत्यांची निवड केली.

युवास्पार्क २०२५ चे विजेते:

· प्रथम पारितोषिक: श्री. नेत्रदीप आर. कदम – Shield Tech (प्रकल्प: N-Phantom Stealth Coating)

· द्वितीय पारितोषिक: श्री. हर्ष कोटेचा (प्रकल्प: Eco Smart Capsule)

· तृतीय पारितोषिक: श्री. सारंग बी. पाटील (प्रकल्प: Tech GI Supply Chain 5.0)

याशिवाय, सर्वोत्कृष्ट १० स्पर्धकांना त्यांचा स्टार्टअप उभारण्यासाठी 'केसीआयआयएल' तर्फे एक वर्षासाठी विनामूल्य इन्क्युबेशन साहाय्य प्रदान केले जाईल. सर्व विजेत्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले असून त्यांच्या धाडसी आणि नाविन्यपूर्ण विचारांनी स्पर्धेत नवे मापदंड स्थापित केले आहेत. "युवास्पार्कने विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला एक प्रभावी व्यासपीठ मिळवून दिले आहे. या यशस्वी आयोजनामुळे विद्यापीठातील स्टार्टअप संस्कृतीला निश्चितच चालना मिळेल," असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

**बातमी नं. २**

जळगाव (प्रतिनिधी) दि. १० ऑक्टोबर : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील आंतरविद्याशाखीय अभ्यास प्रशाळे अंतर्गत शिक्षणशास्त्र विभागातर्फे नूतन मराठा अध्यापक विद्यालय, जळगाव येथे राबविण्यात आलेल्या आंतरवासिता उपक्रमाचा दिनांक ८ ऑक्टोबर २०२५ रोजी समारोप समारोह संपन्न झाला. “फक्त पुस्तकं वाचून शिक्षक घडत नाही; अनुभव, जबाबदारी आणि समाजाशी एकरूप होणं हेही तेवढंच महत्त्वाचं आहे” असा शिक्षकत्वचा संस्कार या पंधरवडाभर चाललेल्या आंतरवासिता उपक्रमातून साकार झाला.

एम. एड. द्वितीय वर्ष अभ्यासक्रमातील शिक्षक व्यवसायासाठी आवश्यक कौशल्ये आत्मसात करण्यासाठी नूतन मराठा विद्यालय जळगावच्या आवारात असलेल्या शिक्षणशास्त्र विद्यालय येथे दिनांक २३ सप्टेंबर २०२५ ते ८ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत आयोजित आंतरवासिता उपक्रमाचा समारोप मा. प्राचार्या डॉ. एस. डी. सोनवणे यांच्या अध्यक्षतेत पार पडला. या प्रसंगी आंतरविद्याशाखीय अभ्यास प्रशाळेच्या संचालक तथा शिक्षणशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मनीषा इंदाणी या उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वतीच्या प्रतिमेचेपूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आले. त्यानंतर सर्व मान्यवरांचे स्वागत आणि सत्कार करण्यात आले.

स्वाती लावणे, शिवानी ठाकरे, कशीश पवार, जान्हवी तिवारी,पूजा साळुंखे, गौरी निंबाळकर आणि सोनल या विद्यार्थ्यांनी सहभाग घेत कलगुणांचे सादरीकरण केले. सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उत्साही शैलीत विरसिंग पावरा यांनी केले. यानंतर आंतरवासिता उपक्रमादरम्यान राबविण्यात आलेल्या विविध शैक्षणिक आणि मैदानी स्पर्धांच्या पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. यात वक्तृत्व स्पर्धेत तृतीय- गौरी निंबाळकर, द्वितीय- सना खाटीक, प्रथम- शीतल शिंदे. पोस्टर सादरीकरण स्पर्धेत तृतीय- जान्हवी तिवारी, द्वितीय- शालिनी सुरवाडे, प्रथम- सविता पाटील, ५० मी. धावणे (मुली) तृतीय- शुभांगी शिंदे, द्वितीय- दुर्गा अडवाल, प्रथम- अलकीया ठाकूर, ५० मी. धावणे (मुले) द्वितीय- रवींद्र पावरा, प्रथम- अनिल पावरा, भालाफेक (मुली) तृतीय- देवकी सोनवणे, द्वितीय- स्वाती लावणे, प्रथम- शुभांगी शिंदे, भालाफेक (मुले) द्वितीय- अविनाश वळवी, प्रथम- डोंगरसिंग पावरा, गोळाफेक (मुली) तृतीय- पाटील माधुरी, द्वितीय- दुर्गा अडवाल, प्रथम- शुभांगी शिंदे, गोळाफेक (मुले) द्वितीय- रवींद्र पावरा, प्रथम- डोंगरसिंग पावरा, थाळीफेक (मुली) तृतीय- साळुंके पूजा, द्वितीय- पूनम पाटील, प्रथम- शुभांगी शिंदे, थाळीफेक (मुले) द्वितीय- दुर्गेश जाधव, प्रथम- डोंगरसिंग पावरा, विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रे आणि पारितोषिके प्रदान करण्यात आली. या क्षणी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद आणि समाधान हा संपूर्ण आंतरवासीत उपक्रमाचा सारांशच वाटत होता. या सत्राचे सूत्रसंचालन भूषण अहिरे यांनी केले.

समारोपाच्या वेळी गंगा चौधरी, स्वप्नील पाटील, पूनम पाटील या विद्यार्थी प्रतिनिधींनी आपली मनोगते व्यक्त केली. डॉ. स्वाती तायडे यांनी विद्यार्थ्यांच्या सहभाग, सर्जनशीलता आणि कर्तव्यनिष्ठेबद्दल समाधान व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोपपर भाषणात मा. प्राचार्या डॉ. एस. डी. सोनवणे यांच्या वतीने प्राध्यापक आर. एस. पाटील यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करत म्हटले- “शिक्षक म्हणजे केवळ अध्यापक नव्हे, तर समाजाला दिशा देणारा दीपस्तंभ आहे. आंतरवासीता उपक्रम हे त्या दीपस्तंभातील

तेलासारखे आहे; जे मूल्य, शिस्त आणि जबाबदारीचा प्रकाश देतं. अशा उपक्रमांतून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि आत्मअनुशासनाची बीजे रुजतात." त्यांनी सर्व विद्यार्थी व प्राध्यापकांचे कौतुक करत भविष्यातील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्या डॉ. एस. डी. सोनवणे, प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. मनीषा इंदाणी, संचालक, आंतरविद्याशाखीय अभ्यास प्रशाळा, प्राध्यापक वाय. एस. ननावरे, प्रा. आर. एस. पाटील, डॉ. एस. बी. पाटील, प्रा. एस, के. पाटील, प्रा. पी आय. परदेशी, प्रा. एम. पी. भदाणे, शिक्षणशास्त्र विभागातील डॉ. स्वाती तायडे, डॉ. रणजित पारधे हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पूनम पाटील हिने केले तर विद्यार्थीनी मोनिका लोखंडे हिने आभार मानले. संपूर्ण उपक्रमाच्या आयोजनात आणि यशस्वीतेत एम.एड. शिक्षक प्रशिक्षणार्थींचे उत्स्फूर्त सहकार्य लाभले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: १० ऑक्टोबर, २०२५

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता